परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in 9881265102
संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 91 | शुक्रवार दि. 24 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



## बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत मतदानाचा टक्का घसरला

### सुनेत्रा पवार यांच्या ‘रेकॉर्डब्रेक’ मताधिक्याचा 4 ‘मे’ला होणार फैसला



बारामती - अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर बारामतीत झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीसाठी सायंकाळी 5 वाजेपर्यंत 52.44 टक्के मतदान झाले. पोटनिवडणुकीसाठी पवार यांच्यासह 23 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र, विरोधी उमेदवारांमध्ये एकही राष्ट्रीय पक्षाचा उमेदवार रिंगणात नसल्याने निवडणूक पूर्णपणे एकतर्फी पार पडल्याचे चित्र आहे. विरोधी उमेदवारांनी केवळ उमेदवारी कायम ठेवली, मात्र प्रचारात सक्रिय सहभाग घेतला नाही. सकाळी 9 वाजेपर्यंत अवघे 8.1 टक्के मतदान झाले होते. त्यानंतर 11 वाजेपर्यंत 20.59 टक्के मतदान झाले. दुपारी 1 वाजेपर्यंत 31.91 टक्के, तर 3 वाजेपर्यंत 40.36 टक्के मतदानाची टक्केवारी होती. 5 वाजेपर्यंत हे मतदान 52.44 टक्क्यांपर्यंत पोहोचले.

स्वतः उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह त्यांचे दोन्ही पुत्र, पार्थ पवार यांनी काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. उपमुख्यमंत्री पवार यांनी बारामती तालुक्यात माळेगावसह काही मतदान केंद्रांना भेटी देत मतदारांशी संवाद साधला. तसेच जय पवार यांनी बारामती मतदारसंघात दिवसभर विविध मतदान केंद्रांना भेटी देत परिस्थितीवर लक्ष ठेवले.

खासदार सुप्रिया सुळे यांनी मुलगी रेवती, रणजित पवार, शुभांगी पवार यांच्यासह शहरातील रिमांड होम येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. तसेच त्यांचे पुत्र जय पवार यांनी जळोची येथे मतदान केले. युगेंद्र पवार, त्यांचे वडील श्रीनिवास पवार आणि मातोश्री शर्मिला पवार यांनी काटेवाडीत मतदानाचा हक्क बजावला.

दरम्यान, पान 3 वर

## मोदींच्या भाषणाचं दूरदर्शनवर प्रसारण हा आचारसंहितेचा भंग

### कॉँग्रेसची सुप्रीम कोर्टात याचिका



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 18 एप्रिल 2026 रोजी देशाला उद्देशून केलेल्या भाषणाचे दूरदर्शन आणि संसद टीव्हीवर प्रक्षेपण केल्या प्रकरणी काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. केरळमधील काँग्रेस नेते आणि माजी खासदार टी. एन. प्रथापन यांनी सर्वोच्च न्यायालयात याप्रकरणी याचिका दाखल केली आहे. केरळ आणि देशाच्या इतर भागांत निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू असताना प्रसारित करण्यात आलेल्या या भाषणावर प्रथापन यांनी आक्षेप घेतला आहे.केरळ आणि देशाच्या इतर भागांत निवडणुकांची प्रक्रिया सुरु असताना (आचारसंहिता लागू असताना), सरकारी माध्यमांचा (दूरदर्शन) वापर राजकीय हेतूने करणे हे ‘आदर्श आचारसंहिते’चे उल्लंघन आहे, असा आरोप प्रथापन यांनी याचिकेतून केला आहे. पंतप्रधान मोदींच्या भाषणाचे प्रसारण नागरिक कायदा 1951 आणि आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असल्याचे प्रथापन यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला पान 3 वर

## आज ठळक

### मोंढा भागात ट्रान्सफार्मर बिघाड; महावितरणच्या तत्परतेमुळे रात्री वीजपुरवठा सुरळीत




परळी / प्रतिनिधी आज गुरुवार, दि. 23 एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास परळी शहरातील मोंढा परिसरातील डीपीला एका अज्ञात वाहनाची धडक बसल्याने ट्रान्सफार्मरमध्ये बिघाड झाला. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे दिवसभर मोंढा भागातील नागरिकांना वीजपुरवठ्याअभावी मोठा त्रास सहन करावा लागला.

सध्या एप्रिल महिन्यातील कडक उन्हामुळे तापमान 40 अंशांपर्यंत पोहोचले असून, अशा परिस्थितीत वीज नसल्याने नागरिकांची अक्षरशः ससेहोलपट झाली. दरम्यान, महावितरणच्या (पॉवर हाऊस) कर्मचाऱ्यांनी भर उन्हात ट्रान्सफार्मर दुरुस्तीसाठी अथक प्रयत्न केले; मात्र तांत्रिक बिघाड गंभीर असल्याने तो तत्काळ दुरुस्त करणे शक्य झाले नाही.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी अभियंता श्री. राठोड यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन त्यांनी तत्काळ निर्णय घेत पान 3 वर

## “उद्धव ठाकरे यांनीच विधान परिषदेची निवडणूक लढावी”; सुप्रिया सुळे यांनी केली आग्रहाची विनंती



विधानसभेतून विधान परिषदेवर निवडून द्यावयाच्या 9 जागांसाठी 12 मे रोजी मतदान होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता अधिक आहे. पण महायुतीने एक जादाचा उमेदवार दिला तर अटीतटीची लढत होऊ शकते. विधानसभेतील संख्याबळाचा विचार करता महाविकास आघाडीतील तीन पक्षांना मिळून एकच जागा विधान परिषदेत निवडून आणता येणार आहे. यातच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेउद्धव ठाकरे यांना विधान परिषद निवडणूक लढवण्याची आग्रही विनंती केली आहे. राज्यसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या उमेदवारीला महाविकास आघाडीने पाठिंबा दिला होता व ती निवडणूक बिनविरोध झाली होती. विधानसभेतील संख्याबळाचा विचार करता महाविकास आघाडीतील तीन पक्षांना मिळून एकच जागा विधान परिषदेत निवडून आणता येणार आहे. राज्यसभेला आम्ही शरद पवारांच्या पाठीशी पान 3 वर


## राज्यभर एक लाखांहून अधिक नोकऱ्यांची संधी!



मुंबई : राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी तब्बल 2 लाख 56 हजार कोटींच्या 18 विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास बुधवारी मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यामुळे सुमारे एक लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे. ‘एस्सार एक्सप्लोरेशन अँड प्रॉडक्शन’ कंपनी रायगडमध्ये सर्वात मोठी 56 हजार 852 कोटींचा गूंतवणूक करणार असून तेथे 25 हजार जणांना रोजगार मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पान 3 वर

## केजमध्ये व्हॉलीबॉलचा धडाका! अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य स्पर्धेचे आयोजन



प्रकाश मुंडे | केज तालुका प्रतिनिधी केज शहरात अनेक वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर पुन्हा एकदा व्हॉलीबॉलचा थरार रंगणार आहे. पनगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, यामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे आणि क्रीडामय वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील नामवंत खेळाडू आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करणार असल्याने क्रीडाप्रेमींच्या नजरा या स्पर्धेकडे लागल्या आहेत.

**खेळाला नवी उभारी देण्याचा ‘अक्षय’ संकल्प**

अक्षय भैय्या मुंदडा यांचे खेळाप्रती असलेले प्रेम सर्वश्रुत आहे. यापूर्वी त्यांनी अनेक क्रिकेट स्पर्धांच्या माध्यमातून स्थानिक खेळाडूंना पान 3 वर

## पाणीपुरवठा योजना, विकासकामांना गती द्या

### दिशा समितीच्या मॅरोथॉन बैठकीत खा.बजरंग सोनवणेंनी तब्बल 27 विभागाचा घेतला आढावा



बीड: केंद्र सरकारच्या कोट्यवधींच्या निधीतून राबवल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचवताना यंत्रणा सुस्त असू नयेत, जलजीवन मिशन योजना राबवूनही गावे तहाणलेली आहेत. रस्त्याची अवस्था वाईटच आहे, मार्च 2026 संपला तरी अनेक योजनांचे लक्ष्य का झाले नाही अशा प्रश्नांचा खुलासाखा. बजरंग सोनवणे यांनी गुरुवारी मागितला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित ‘जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती’ पान 3 वर

## 2029 ला जनहित लोकशाही पार्टी सक्षम सरकार स्थापन करणार - प्रदेशाध्यक्ष ॲड. शंकर चव्हाण यांची माहिती



मुंबई । प्रतिनिधी: मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता तथा जनहित लोकशाही पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तरुण तडफदार नेतृत्व ॲड. शंकर चव्हाण यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव अल्हाट यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी 2029 च्या विधानसभा व लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठा राजकीय दावा करत, “2029 मध्ये जनहित लोकशाही पार्टी सक्षम सरकार स्थापन करणार,” असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही भूमिका मांडत राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवरही भाष्य केले आहे. ॲड. शंकर चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये स्पष्टपणे नमूद केले की, “महाराष्ट्रातील जनतेचा सध्याच्या सत्ताधाऱ्यांवरील विश्वास ढासळत चालला आहे. विकासाच्या नावाखाली केवळ आश्वासने दिली जात आहेत, मात्र प्रत्यक्षात जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे.” त्यांनी सांगितले की, शेतकरी, बेरोजगार युवक, महिला सुरक्षा आणि कायदा सुव्यवस्था यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर सरकार अपयशी ठरले आहे. ते पुढे म्हणाले की, “जनहित लोकशाही पार्टी ही केवळ राजकारण करण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या प्रश्नांवर ठोस काम करण्यासाठी पुढे आली आहे. आम्ही लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी कटिबद्ध आहोत.” त्यांनी पक्षाच्या आगामी धोरणांबाबत पान 3 वर

## सुट्टीच्या काळातही विद्यार्थ्यांचा अभ्यासाशी असलेला दुवा कायम ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. - श्री दीपक तांदळे

### संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागाचा अनोखा उपक्रम; उन्हाळी अभ्यासक्रमामुळे सुट्टीचा प्रत्येक दिवस ठरणार ‘अभ्यासाचा उत्सव’!



परळी (प्रतिनिधी) : उन्हाळ्याच्या तळपत्या उष्णतेतही ज्ञानाचा दीप अखंड प्रज्वलित ठेवण्याचा स्तुत्य उपक्रम श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती व विद्यानगर विभागाने राबवला आहे. सुट्टी म्हणजे केवळ विश्रांतीचा काळ नसून शिकण्याची नवी संधी आहे, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत शाळेत आज पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना आकर्षक आणि उपयुक्त अशा उन्हाळी अभ्यासक्रमाचे वाटप करण्यात आले.





श्री पद्मावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास तांदळे आणि सचिव श्री दीपक तांदळे यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. माधुरीताई तांदळे यांच्या सक्षम मार्गदर्शनातून हा उपक्रम साकार झाला आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यासाशी असलेला दुवा सुट्ट्यांमध्येही कायम राहावा आणि त्यांची बौद्धिक प्रगती अखंड सुरु राहावी, या उद्देशाने या अभ्याससंचाची निर्मिती करण्यात आली आहे.

या विशेष अभ्याससंचामध्ये पहिली ते सातवीच्या सर्व पान 3 वर

## ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहाय्यातून 30 गुंठ्यांत सव्वातीन लाखांचे उत्पन्न!

### लिंबू शेतीतून डिगंबर गडदे यांचा यशस्वी प्रयोग



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) परळी तालुक्यातील वाघाळा येथील शेतकरी डिगंबर जिजाराम गडदे यांनी अल्पभूधारक असूनही आधुनिक पद्धतींचा अवलंब करत लिंबू शेतीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. केवळ 1 एकर शेती असलेल्या गडदे यांनी 2019 साली 30 गुंठे जमिनीत 100 लिंबूची रोपे लावून शेतीत नवा प्रयोग सुरु केला. या लिंबू बागेला लागवडीपासून अवघ्या 27 महिन्यांत फळधारणा सुरु झाली. ग्लोबल विकास ट्रस्टचे सुयोग्य मार्गदर्शन आणि गडदे यांनी केलेल्या नियोजनामुळे चालू वर्षात त्यांनी सुमारे 9 क्विंटल लिंबू उत्पादन घेतले आहे. सध्या बाजारात लिंबाला 125 रुपये प्रति किलोपर्यंत भाव मिळत असला तरी, कधी कधी हा दर 10 रुपयांपर्यंत घसरतो. अशा चढ-उतारांमध्येही गडदे यांना पान 3 वर

## शेख मुदस्सीर यांची ‘सकल मुस्लिम युवक संघाच्या’ प्रदेश संघटक पदी निवड.



परळी /प्रतिनिधी :- परळी येथील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असलेले शेख मुदस्सीर नसीर यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या प्रदेश संघटक पदी निवड करण्यात आली आहे. ही निवड दिनांक 23 एप्रिल रोजी करण्यात असून आहे.

शेख मुदस्सीर हे मागील अनेक वर्षांपासून समाजकारण आणि पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत. सामाजिक प्रश्नांची चांगली जाण, लोकांशी संवाद साधण्याची क्षमता आणि युवकांना एकत्र कौशल्य यामुळे त्यांनी आपली पान 3 वर

## इंद्रायणी कोचिंग क्लासेस व श्री.गजानन महाराज नवोदय गुरुकुलची शिष्यवृत्ती महासराव परीक्षा उत्साहात संपन्न...



परभणी/प्रतिनिधी:येथील इंद्रायणी कोचिंग क्लासेस व श्री. गजानन महाराज नवोदय गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शिष्यवृत्ती महासराव परीक्षा 2026' नुकतीच दिमाखात पार पडली. अत्यंत शिस्तबद्ध नियोजन आणि पारदर्शक प्रक्रियेमुळे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आसन व्यवस्थेपासून ते वेळेच्या व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक बाबतीत कमालीची सुसूत्रता दिसून आली.

परीक्षा संपल्यानंतर लगेच निकाल जाहीर करणे हे या उपक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना स्व-मूल्यमापन करणे सोपे झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके आणि बक्षिसे देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

या परीक्षेमध्ये सोहम गायकवाड या विद्यार्थ्याने 300 पैकी 248 गुण घेऊन तीन हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळवले, तसेच दिव्यांका दीपक पंडित या विद्यार्थिनीने 242 गुण मिळवून

द्वितीय क्रमांकाचे दोन हजार रुपये आणि गजानन महाराज गुरुकुलचा विद्यार्थी आयुष गोविंद हुंबाड 236 गुण मिळवून व हर्षवर्धन चव्हाण 230 गुण प्राप्त करून तृतीय क्रमांकाचे अकराशे रुपयांचे पारितोषिक मिळवलं. तसेच गुणानुक्रमे इतर पंचवीस विद्यार्थ्यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

इंद्रायणी कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा.ज्ञानेश्वर कटारे सर,श्री. गजानन महाराज नवोदय गुरुकुलचे संचालक प्रा.भारत पाते सर, परीक्षा यशस्वी करण्यात अनमोल सहकार्य करणारे प्रा.गजानन दराडे सर आणि सर्व गुरुकुलचे संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली हा विद्यार्थीभिमुख उपक्रम यशस्वी झाला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेचे उत्तम विचारपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचे पालकांनी विशेष आभार मानले आहेत.

# मतदारसंघ पुनर्रचना आयोग: भारतीय लोकशाहीतील संतुलनाचा आधारस्तंभ

**डॉ. भारत कऱ्हाड**



भारतीय लोकशाहीची खरी ताकद केवळ निवडणुकांच्या नियमित आयोजनात नसून त्या निवडणुका न्याय्य, प्रतिनिधिक आणि संतुलित पद्धतीने पार पडण्यात आहे. या प्रक्रियेत मतदारसंघांची योग्य रचना अत्यंत महत्त्वाची ठरते. याच उद्देशाने मतदारसंघ पुनर्रचना आयोग (Delimitation Commission of India) ही संस्था कार्यरत आहे. देशातील लोकसंख्येच्या बदलत्या स्वरूपानुसार लोकसभा आणि विधानसभांच्या मतदारसंघांच्या सीमा निश्चित करून प्रत्येक मतदाराला समान प्रतिनिधित्व मिळावे, हा या आयोगाचा मुख्य हेतू आहे. "एक व्यक्ती, एक मत, एक समान मूल्य" या लोकशाही तत्त्वाची अंमलबजावणी प्रत्यक्षात घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हा आयोग करतो.

भारतामध्ये मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची स्थापना संसदेमार्फत मतदारसंघ पुनर्रचना कायद्याअंतर्गत केली जाते. ही एक स्वतंत्र, स्वायत्त आणि अधिकारसंपन्न संस्था आहे. तिच्या निर्णयांना अंतिम मानले जाते आणि त्यावर न्यायालयीन पुनरावलोकन सहसा होत नाही. त्यामुळे या आयोगाची भूमिका अत्यंत प्रभावी आणि निर्णायक ठरते. भारतीय राज्यघटनेतील कलम 82 आणि कलम 170 यांद्वारे लोकसभा आणि विधानसभांच्या मतदारसंघ पुनर्रचनेची तरतूद करण्यात आली आहे.

इतिहास पाहिला तर भारतात मतदारसंघ पुनर्रचना आयोग चार वेळा स्थापन करण्यात आला आहे— 1952, 1963, 1973 आणि 2002. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 1952 मध्ये पहिला आयोग स्थापन झाला. त्यानंतर वेळोवेळी लोकसंख्येतील बदल लक्षात घेऊन पुनर्रचना करण्यात आली. मात्र 1976 ते 2001 या कालावधीत ही प्रक्रिया स्थगित ठेवण्यात आली होती. यामागील प्रमुख कारण म्हणजे देशात लोकसंख्या नियंत्रण धोरणाला प्रोत्साहन देणे. ज्या राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले त्यांना कमी प्रतिनिधित्व मिळू नये, यासाठी हा निर्णय घेतला गेला. 2002 मध्ये पुन्हा आयोग स्थापन झाला आणि 2008 पर्यंत व्यापक पुनर्रचना करण्यात आली.

मतदारसंघ पुनर्रचना आयोगाची रचना अत्यंत संतुलित ठेवण्यात आलेली आहे. साधारणपणे सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अध्यक्ष म्हणून कार्य करतात. त्यांच्यासोबत भारतीय निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी आणि संबंधित राज्यांचे निवडणूक आयुक्त सदस्य म्हणून कार्य करतात. या रचनेमुळे आयोगाचे निर्णय निष्पक्ष आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली घेतले जातात.

या आयोगाची कार्यपद्धती पारदर्शक आणि लोकाभिमुख आहे. सर्वप्रथम जनगणनेचा अधिकृत डेटा आधार म्हणून घेतला जातो. त्यानंतर प्राथमिक मसुदा तयार केला जातो, ज्यामध्ये मतदारसंघांच्या नव्या सीमांचे प्रस्ताव असतात. हा मसुदा सार्वजनिक केला जातो आणि नागरिक, राजकीय पक्ष तसेच विविध संघटनांकडून हरकती आणि सूचना मागविल्या जातात. त्यानंतर सार्वजनिक सुनावण्या घेतल्या जातात. या सर्व प्रक्रियेनंतर अंतिम अहवाल प्रसिद्ध केला जातो. विशेष म्हणजे, आयोगाचे निर्णय अंतिम असतात आणि त्यावर न्यायालयात सहज आव्हान देता येत नाही.

मतदारसंघ पुनर्रचना आयोगाचे मुख्य कार्य म्हणजे मतदारसंघांचे सीमांकन करणे, लोकसंख्येनुसार जागांचे वाटप करणे आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षित मतदारसंघ निश्चित करणे. या प्रक्रियेत भौगोलिक, प्रशासकीय आणि सामाजिक घटकांचा विचार केला जातो. उदाहरणार्थ, एखादा मतदारसंघ आखताना जिल्ह्यांच्या सीमा, नैसर्गिक अडथळे, स्थानिक संपर्क व्यवस्था आणि सामाजिक रचना यांचा विचार केला जातो.

2002 च्या मतदारसंघ पुनर्रचना आयोगाने भारतीय निवडणूक व्यवस्थेत मोठे बदल घडवून आणले. शहरीकरण वाढल्यामुळे शहरांना अधिक प्रतिनिधित्व मिळाले. अनेक मतदारसंघांच्या सीमा बदलल्या गेल्या आणि काहींची नावेही बदलली गेली. तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आरक्षणाचे पुनर्वाटप करण्यात आले. या बदलांचा थेट परिणाम निवडणूक निकालांवर आणि राजकीय धोरणांवर झाला.

लोकशाहीच्या दृष्टीने मतदारसंघ पुनर्रचना आयोगाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. जर मतदारसंघांचे योग्य सीमांकन झाले नाही, तर काही ठिकाणी मतदारसंख्या खूप जास्त तर काही ठिकाणी खूप कमी राहते. यामुळे मतांच्या मूल्यामध्ये असमतोल निर्माण होतो. या प्रक्रियेने हा असमतोल दूर केला जातो आणि प्रत्येक मतदाराला समान संधी मिळते. त्यामुळे लोकशाही अधिक सक्षम आणि विश्वासार्ह बनते.

अलीकडील काळात महिला आरक्षण कायदा 2023 म्हणजेच महिला आरक्षण कायद्यामुळे मतदारसंघ पुनर्रचना आयोगाचे महत्त्व अधिक वाढले आहे. या कायद्यानुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये 33 टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. मात्र हे आरक्षण लागू करण्यासाठी प्रथम नवीन जनगणना होणे आवश्यक आहे आणि त्यानंतर मतदारसंघ पुनर्रचना आयोगाकडून नवीन सीमांकन केले जाईल. त्यानंतरच महिला आरक्षणाची अंमलबजावणी होईल.

तथापि, या प्रक्रियेमध्ये काही आव्हाने देखील आहेत. लोकसंख्येतील प्रादेशिक असमतोल हा एक मोठा मुद्दा आहे. उत्तर भारतातील राज्यांमध्ये लोकसंख्या वाढ जास्त आहे, तर दक्षिण भारतात ती तुलनेने कमी आहे. जर पूर्णपणे लोकसंख्येच्या आधारावर जागांचे वाटप झाले, तर उत्तर भारताला अधिक प्रतिनिधित्व मिळू शकते, ज्यामुळे राजकीय संतुलन बिघडू शकते. तसेच मतदारसंघांच्या सीमांमध्ये बदल झाल्यामुळे विद्यमान नेत्यांच्या राजकीय समिकरणांमध्ये बदल होतो, ज्यामुळे विरोध निर्माण होऊ शकतो.

2026 नंतर अपेक्षित असलेली पुढील मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. नवीन जनगणनेच्या आधारे ही पुनर्रचना केली जाईल आणि देशातील बदलत्या लोकसंख्येचे वास्तव प्रतिबिंब त्यात दिसेल. याच प्रक्रियेनंतर महिला आरक्षण लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही प्रक्रिया केवळ तांत्रिक न राहता सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदलांची दिशा ठरवणारी ठरेल.

अखेरीस असे म्हणता येईल की मतदारसंघ पुनर्रचना आयोग हा भारतीय लोकशाहीच्या संरचनेतील एक अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्याच्या कार्यामुळे निवडणुका अधिक न्याय्य, संतुलित आणि प्रतिनिधिक होतात. भविष्यातील पुनर्रचना प्रक्रिया भारताच्या राजकीय नकाशात मोठे बदल घडवू शकते आणि विशेषतः महिला प्रतिनिधित्व, प्रादेशिक संतुलन आणि लोकशाहीतील समावेशकता यांना नवे परिमाण देऊ शकते. त्यामुळे या आयोगाचे कार्य समजून घेणे हे प्रत्येक जागरूक नागरिकासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# अश्विनी देशमुख यांना निवडणूक लढवायची नव्हती? धनंजय देशमुखांनी भूमिका स्पष्ट केली

## धनंजय देशमुख यांची भूमिका; सर्व प्रश्नांची उत्तरे निवडणुकीनंतर देणार



बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर धनंजय देशमुख यांनी राजकीय टीकांना उत्तर देताना स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली. माझ्यासाठी सध्या राजकारण दुय्यम असून, माझ्या भावाला आणि गावाला न्याय मिळवून देणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. मस्साजोग येथील सरपंचपदासाठी पोटनिवडणूक होत आहे. यामध्ये स्वरूपानंद देशमुख विरुद्ध अश्विनी संतोष देशमुख अशी लढत होत आहे. यामध्ये अश्विनी देशमुख यांना निवडणूक लढवायची नव्हती, त्यांना ती लढवण्यासाठी दबाव आणण्यात आला असा आरोप स्वरूपानंद देशमुख यांनी केला होता.

राजकारण या ठिकाणी माझ्यासाठी दुय्यम आहे. सध्या केस हा महत्त्वाचा भाग असून त्यावरच माझा जास्त फोकस आहे. 21 तारखेला याबाबत सविस्तर उत्तर देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच त्यांनी इशारा दिला की, स्वरूपानंद देशमुख यांना जो कोणी पाठिंबा देईल, तो उघडपणे समोर येईल. गुप्त पाठिंबा देण्याचा प्रश्नच नाही. लोकशाही मूल्यांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, प्रत्येकाला व्यक्तीस्वातंत्र्य आहे. मात्र, पीडित कुटुंबावर बोलताना संवेदनशीलता राखली पाहिजे. यावर आता स्व. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. स्वरूपानंद देशमुख यांच्याबाबत बोलताना त्यांनी, त्यांच्या बोलण्याकडे मी फारसे लक्ष देत नाही. त्यांना स्वाभिमानी मस्साजोगची जनता योग्य ते उत्तर देईल, असे म्हटले. ते पुढे म्हणाले, मला राजकारण करायचे असते तर मी स्वतःच उमेदवार झालो असतो. मात्र, सद्यपरिस्थितीत ते संयुक्तिक वाटले नाही. त्यामुळे मी या गोष्टीपासून दूर राहून केवळ न्यायाच्या लढाईवर लक्ष केंद्रित केले आहे.

कुटुंबावर होणाऱ्या टीकेबाबत त्यांनी नाराजी व्यक्त करत, माझ्या कुटुंबावर कोणीही बोलण्याचा प्रयत्न करू नये. पीडित कुटुंबावर टीका करणे कितपत योग्य आहे, हे प्रत्येकाने समजून घ्यायला हवे, असा इशारा दिला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी सांगितले की, 28 तारखेला मतदानातून सर्व काही स्पष्ट होईल. त्यानंतर निकाल लागल्यानंतर मी आणि वहिनी मिळून सविस्तर भूमिका मांडू. स्वरूपानंद देशमुख यांना कोणी उभे केले, हेही तेव्हा स्पष्ट करू. तसेच, माझ्या भावाने दलित बांधवांसाठी प्राणाची आहुती दिली आहे, असे भावनिक वक्तव्य करत त्यांनी प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित केले.




# राजकारणापुढे शहाणपण चालत नाही : समाजकारणाची काटेरी वाट आणि चळवळींचा विघातक प्रवास

समाजाच्या उभारणीसाठी,अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी, वंचितांच्या हक्कांसाठी आणि बदलाच्या आशेने उभ्या राहणाऱ्या सामाजिक चळवळी या कोणत्याही लोकशाही समाजाच्या प्राणशक्ती असतात.या चळवळींच्या बळावर अनेक अन्यायकारक परंपरा मोडल्या गेल्या,सत्तेच्या अहंकाराला प्रश्न विचारले गेले, आणि सामान्य माणसाला आपला आवाज आहे याची जाणीव झाली.पण दुःखाची गोष्ट अशी की,ज्या चळवळींनी समाजाला दिशा द्यायला हवी होती,त्या अनेकदा राजकारणाच्या सावलीत येऊन कमजोर झाल्या, विखुरल्या, विकल्या गेल्या किंवा संपूनच गेल्या. म्हणूनच अनेकदा लोक म्हणतात "राजकारणापुढे शहाणपण चालत नाही." ही केवळ म्हण नाही; तर आजच्या सामाजिक वास्तवाचे अचूक चित्रण आहे.

समाजकारण आणि राजकारण हे दोन्ही शब्द वरकरणी जवळचे वाटतात,पण त्यांच्या केंद्रबिंदूत मोठा फरक आहे.समाजकारणाचे केंद्र असते माणूस,मूल्ये,न्याय, समानता आणि बदल; तर राजकारणाचे केंद्र अनेकदा सत्ता,प्रभाव,गणित,गटबाजी, स्वार्थ आणि नियंत्रण हे असते.अर्थात सर्व राजकारण वाईट असते असे नाही; लोकशाहीत राजकारण आवश्यक आहे.पण जेव्हा मूल्याधिष्ठित समाजकारणावर सत्ताकेंद्रित राजकारण हावी होते,तेव्हा चळवळींचे रूपांतर आंदोलनातून "व्यवहार" मध्ये होऊ लागते.त्यावेळी मुद्दे मागे पडतात आणि पदे पुढे येतात.विचार बाजूला होतात आणि चेहरे केंद्रस्थानी येतात. ध्येय विसरले जाते आणि गटबाजी उरते.

सामाजिक चळवळींचा जन्म हा सहसा वेदनेतून,अन्यायातून आणि जिवंत प्रश्नांतून होत असतो.एखाद्या गावात पाण्याचा प्रश्न असतो,कुठे शेतकऱ्यांवर अन्याय असतो, कुठे महिलांवर अत्याचार,कुठे जातीय भेदभाव,कुठे अंधश्रद्धेचा अंधार,कुठे शिक्षणाचा अभाव,कुठे पर्यावरणाचा विध्वंस,तर कुठे सांस्कृतिक वारशाचे दुर्लक्ष.अशा वेळी काही जिद्दी माणसे उभी राहतात.त्यांच्याकडे पैसा नसतो,सत्ता नसते,मिरवणूक नसते, माध्यमांचे लक्ष नसते.पण एक जळता प्रश्न आणि त्यासाठी जळणारी अंतःकरणे असतात.हीच खरी चळवळ असते.पण जेव्हा त्या चळवळीला लोकांचा प्रतिसाद मिळू लागतो, माध्यमांचे लक्ष मिळू लागते.समाजात प्रभाव वाढू लागतो.तेव्हा राजकीय शक्तींना त्या चळवळीचे महत्त्व दिसू लागते.तेव्हा सुरु होतो "समर्थन" नावाचा हस्तक्षेप.सुरुवातीला तो निरुपद्रवी वाटतो. "आम्ही तुमच्या सोबत आहोत", "तुमचा प्रश्न योग्य आहे", "तुमच्या लढ्याला आमचा पाठिंबा आहे", "तुमच्यासाठी निधी देऊ", "तुमच्या कार्यक्रमाला आमचे नेते येतील"अशा वाक्यांमधून चळवळीत राजकारणाची पहिली पायरी ठेवली जाते. कार्यकर्त्यांना वाटते, मोठे लोक आपल्या पाठीशी उभे राहत आहेत,यामुळे प्रश्न लवकर सुटेल. पण अनेकदा हे समर्थन नसून ताबा घेण्याची प्रक्रिया असते. कारण जिथे लोकशक्ती आहे तिथे मतशक्ती आहे, आणि जिथे मतशक्ती आहे तिथे राजकारणाचे डोळे असणारच.हळूहळू चळवळीचे नेतृत्व बदलू लागते. मूळ कार्यकर्ते बाजूला पडतात आणि "संपर्क असलेले", "पोहोच असलेले", "नेत्यांच्या जवळचे" लोक पुढे येऊ लागतात. चळवळीच्या बैठकीत मुद्द्यांपेक्षा फोटो काढण्यावर भर दिला जातो. प्रश्नांपेक्षा प्रेसनोट महत्त्वाच्या वाटू लागतात. संघर्षापेक्षा मंच,घोषणांपेक्षा बॅनर,विचारांपेक्षा व्हायरल पोस्ट आणि बांधिलकीपेक्षा उपस्थितीपत्रक महत्त्वाचे वाटू लागते. अशा वेळी चळवळीचा आत्मा मरू लागतो. बाहेरून ती चळवळ दिसते,पण आतून ती रिकामी झालेली असते.

राजकारणाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे ग्लॅमर आणि पैसा.आजच्या काळात सत्तेभोवती एक वेगळे तेज निर्माण झाले आहे. मोठ्या गाड्या,सुरक्षा,मंच,सत्कार,बॅनर, सोशल मीडियावरील प्रसिद्धी,सततची हालचाल,पैशांचा प्रवाह हे सर्व पाहून अनेक तरुणांना समाजकारणाची संयमी,काटेरी,कष्टप्रद वाट निरर्थक वाटू लागते. समाजकारणात वर्षानुवर्षे काम करूनही नाव नसते,पद नसते,घरची परिस्थिती तशीच राहते, उलट शत्रू वाढतात.पण राजकारणात थोडे हुशार नेटवर्किंग,थोडा आवाज,थोडी निष्ठा,थोडी चमचेगिरी आणि योग्य वेळी योग्य छावणीत उभे राहणे यामुळे अनेक दरवाजे उघडतात.म्हणूनच अनेकांना विचारांपेक्षा व्यासपीठ,संघर्षापेक्षा सेल्फी,आणि चळवळीपेक्षा पक्ष कार्यालय अधिक आकर्षक वाटते.यामुळे समाजकारणाची खरी वानवा निर्माण होत आहे.आज समाजात कार्यकर्ते दिसतात,पण तळमळीचे कार्यकर्ते कमी होत चालले आहेत. कारण आज अनेकांना "काम" करायचे नसते, "ओळख" बनवायची असते. "प्रश्न" सोडवायचा नसतो, "प्रतिमा" उभी करायची असते. "समाजासाठी जगायचे" नसते, "समाजात दिसायचे" असते. ही मानसिकता चळवळींसाठी अत्यंत घातक आहे. कारण सामाजिक चळवळींचे बळ हे त्याग,सातत्य, प्रामाणिकपणा, वैचारिक स्पष्टता आणि लोकांशी असलेले नाते यात असते; तर राजकारणाची पद्धत अनेकदा तडजोड,गटबाजी, हितसंबंध आणि क्षणिक फायद्यांवर चालते. दोन्हींची कार्यपद्धती वेगळी आहे.त्यामुळे जेव्हा समाजकारण राजकारणाच्या पद्धतीने चालवले जाते, तेव्हा त्याचा परिणाम विघटनात होतो.

अनेक ऐतिहासिक चळवळींचे निरीक्षण केले तर दिसते की,त्यांच्या सुरुवातीच्या टप्प्यात लोकशक्ती,नैतिकता आणि वैचारिक ताकद होती. पण नंतर नेतृत्वाचे व्यक्तीपूजन,सत्तेच्या जवळ जाण्याची लालसा,आर्थिक व्यवहार,अंतर्गत मत्सर,जातीय आणि पक्षीय गणिते,आणि कार्यकर्त्यांचे खच्चीकरण यामुळे त्या कमकुवत झाल्या. चळवळींमध्ये मतभेद असणे स्वाभाविक आहे; पण मतभेदांचे रूपांतर जर अहंकाराच्या युद्धा झाले, तर प्रश्न मरतो आणि व्यक्ती उरतात. मग प्रश्नासाठी सुरु झालेली चळवळ ही कोण मोठा?, कोण प्रमुख?,कोणाचा फोटो पुढे?,कोणाला स्टेजवर बसवायचे? या क्षुल्लक गोष्टींत अडकते. समाज दूरून हे सगळे पाहतो आणि हळूहळू त्याचा विश्वासच उडतो.

सामाजिक चळवळींच्या मोडतोडीमागे आणखी एक गंभीर कारण म्हणजे आर्थिक स्वायत्ततेचा अभाव.समाजकारण करणाऱ्या माणसाकडे बहुतांश वेळा स्थिर साधने नसतात. कार्यक्रम,प्रवास,निवेदने, मोर्चे, कायदेशीर लढाया,जनजागृती,साहित्य,पोस्टर, संघटन या सर्वांसाठी पैसा लागतो.आणि जिथे पैसा लागतो तिथे "दाता" येतो. अनेकदा हा दाता राजकीय असतो.तो निधी देतो,मदत करतो,व्यवस्था करतो,पण त्याबदल्यात स्वतंत्र विचाराचा गळा आवळतो.मग चळवळीला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य राहत नाही. ज्या हाताने मदत घेतली,त्याच हाताविरुद्ध आवाज उठवताना अनेकांच्या पायात बेड्या पडतात.म्हणूनच समाजकारणाची खरी ताकद ही आर्थिक प्रामाणिकता आणि लोकाधारित स्वावलंबनात असते.लोकांनी दिलेल्या छोट्या-छोट्या योगदानातून उभी राहिलेली चळवळ अधिक सशक्त आणि निर्भय असते.

आजच्या काळात सोशल मीडिया हा देखील एक मोठा घटक आहे.समाजकारणाचा प्रसार करण्यासाठी तो उपयोगी आहे,पण त्याने एक नवा रोगही आणला आहे.क्षणिक क्रांतीचा रोग.पोस्ट टाकली,व्हिडिओ केला,दोन भाषणे झाली,फोटो व्हायरल झाले की काहींना वाटते चळवळ झाली. पण खरी चळवळ ही ग्राउंडवर,लोकांत,घामात, संघर्षात,अभ्यासात आणि सातत्यात घडते.सोशल मीडियाने आज अनेकांना "कार्यकर्ता" बनवले आहे,पण त्यातील अनेक जण केवळ डिजिटल घोषणाबाज असतात.राजकारणाला ही पद्धत अधिक अनुकूल आहे,कारण ती दिसणे वाढवते. पण समाजकारणाला बदल हवा असतो. आणि बदलाला कॅमेरा नाही, कष्ट लागतात.

समाजकारण ही खरंच काटेरी वाट आहे. या वाटेवर चालताना टाळ्यांपेक्षा टोमणे जास्त मिळतात. पाठिंब्यापेक्षा संशय जास्त मिळतो. सन्माना पेक्षा अपमान जास्त मिळतो.अनेकदा आपल्याच लोकांकडून अविश्वास मिळतो.कधी कधी ज्यांच्यासाठी लढतो तेच लोक अडचणीच्या वेळी बाजूला होतात. कुटुंबीय नाराज होतात,आर्थिक ओढाताण होते,वेळ जातो,आयुष्य झिजते.पण तरीही काही जिद्दी लोक ही वाट निवडतात,कारण त्यांना पद नको असते परिवर्तन हवे असते.अशा लोकांवरच समाज उभा असतो.पण दुःख हे आहे की,अशा लोकांना समाजाने जपले नाही तर उद्या समाजात वक्ते उरतील,कार्यकर्ते नाहीत,पोस्टर उरतील.प्रश्न नाहीत, मेळावे उरतील, मूल्ये नाहीत.

राजकारणाचा समाजकारणावर होणारा परिणाम केवळ चळवळींच्या विघटनापुरता मर्यादित नसतो. त्याचा परिणाम लोकांच्या मनोधैर्यावर देखील होतो.जेव्हा लोक पाहतात की, कोणतीही चळवळ शेवटी एखाद्या पक्षाच्या बाजूने जाते,कोणतेही आंदोलन शेवटी तडजोडीत संपते, कोणताही नेता शेवटी पदासाठी झुकतो, तेव्हा लोकांचा विश्वासच तुटतो.मग लोक म्हणू लागतात "सगळे सारखेच आहेत." ही भावना लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे.कारण लोकांचा जर सामूहिक कृतीवरचा विश्वास गेला,तर अन्यायाविरुद्ध उठणारे आवाज कमी होतात. सत्ता मग अधिक बिनधास्त होते.म्हणूनच आजच्या काळात सामाजिक चळवळींना स्वतःचे काही मूलभूत तत्त्वे ठामपणे उभी करावी लागतील. पहिली गोष्ट म्हणजे विचारांची स्पष्टता.चळवळ कोणत्या प्रश्नासाठी आहे,तिचे ध्येय काय आहे,तिच्या मर्यादा काय आहेत,आणि कोणत्या तडजोडी कधीही स्वीकारायच्या नाहीत हे स्पष्ट असले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे नेतृत्वाचे विकेंद्रीकरण. एकाच व्यक्तीभोवती चळवळ उभी राहिली की तिचे भवितव्य त्या व्यक्तीच्या स्वार्थ,अहंकार किंवा कमकुवतपणावर अवलंबून राहते. म्हणूनच समूहनेतृत्व आणि प्रक्रियाधारित संघटन आवश्यक आहे.तिसरी गोष्ट म्हणजे आर्थिक पारदर्शकता. चळवळीचा पैसा,मदत,खर्च,देणग्या याबाबत पूर्ण खुलेपणा असेल तर राजकीय हस्तक्षेपाची शक्यता कमी होते.चौथी गोष्ट म्हणजे अभ्यास आणि लोकसंपर्क. घोषणांनी चळवळ पेटते,पण अभ्यासाने ती टिकते.यासोबतच सामाजिक चळवळींनी तरुणांना केवळ भावना नव्हे,तर संघटन,अभ्यास, लोकशाही,नैतिकता आणि शिस्त यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. कारण आज अनेक तरुण आक्रमक आहेत.जागरूक आहेत, प्रश्न विचारतात; पण त्यांना दीर्घकालीन संघटनशक्तीचे भान कमी आहे. राजकारण तात्काळ बक्षिसे देते.समाजकारण उशिरा फळ देते.त्यामुळे समाजकारणात टिकण्यासाठी स्वतःशी प्रामाणिक राहण्याची ताकद लागते. ही ताकद विचारातून,वाचनातून,संघर्षातून आणि जनतेशी असलेल्या नात्यातून येते.

समाजकारण आणि राजकारण यांचा संबंध पूर्णपणे तोडणे शक्य नाही,आणि ते आवश्यकही नाही. कारण अनेक सामाजिक प्रश्नांचे समाधान शेवटी धोरणे,कायदे, शासननिर्णय आणि सत्ताकेंद्रांमधूनच घडते.पण फरक इतकाच की, राजकारणाने समाजकारणाचे नेतृत्व करू नये. समाजकारणाने राजकारणाला दिशा द्यावी.चळवळी या पक्षांच्या मागे उभ्या राहू नयेत. पक्षांना प्रश्नांच्या मागे उभे राहायला भाग पाडले पाहिजे.आज उलट घडते आहे.प्रश्न पक्षांच्या मागे उभे राहत आहेत. ही स्थिती बदलली पाहिजे.समाजकारण म्हणजे केवळ मोर्चे,आंदोलने किंवा घोषणाबाजी नाही. समाजकारण म्हणजे माणूस घडवणे,जाणिवा निर्माण करणे,अंधश्रद्धेला प्रश्न विचारणे,संविधानिक मूल्ये रुजवणे,इतिहासाचे भान जागवणे,पर्यावरण जपणे,वारसा वाचवणे,वंचितांच्या बाजूने उभे राहणे,असमानतेवर प्रहार करणे,आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या सोयीविरुद्ध जाऊन सत्याच्या बाजूने उभे राहणे. ही वाट सोपी नसते; पण समाजाच्या भवितव्यासाठी आवश्यक असते.

आज गरज आहे ती नव्या समाजधर्मी पिढीची जिला पदापेक्षा प्रश्न महत्त्वाचा वाटेल, प्रसिद्धीपेक्षा प्रामाणिकपणा महत्त्वाचा वाटेल,आणि पक्षापेक्षा परिवर्तन महत्त्वाचे वाटेल.समाजाला जर खरंच बदलायचे असेल,तर राजकीय चमकधमक पाहून भुलणारे नव्हे, तर समाजाच्या जखमांवर फुंकर घालणारे,सत्यासाठी उभे राहणारे आणि सत्तेला प्रश्न विचारणारे लोक उभे राहिले पाहिजेत.कारण शेवटी,समाज उभा राहतो तो सत्तेच्या दारात वाकणाऱ्यांमुळे नाही,तर सत्यासाठी ताठ उभे राहणाऱ्यांमुळे.आणि म्हणूनच आज पुन्हा एकदा ठामपणे म्हणावेसे वाटते,राजकारणापुढे शहाणपण चालत नाही,पण शहाणपणाशिवाय समाज वाचत नाही.

**श्री.सुनीलराव जवंजाळ पाटील-**
**7038894078,बुलढाणा.**
**संस्थापक बावन बुरजी (करवंड) बचाव कृती समिती**



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मतदान करण्यापूर्वी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतिस्थळाला भेट देत अभिवादन केले. तसेच काटेवाडी येथे अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांचे मतदानापूर्वी आशीर्वाद घेतले.दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्या ‘रेकॉर्डब्रेक’ मताधिक्याचा फैसला 4 मे रोजी होणार आहे. ‘रेकॉर्डब्रेक’ मतदानासाठी यंदा राष्ट्रवादीने ताकद पणाला लावली आहे. प्रखर उन्हाळा आणि एकतर्फी निवडणुकीमुळे मतदानाचे प्रमाण घटल्याचे मानले जाते

----------------------------------------

कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी, अशी मागणी प्रथापन यांनी या याचिकेतून केली आहे.प्रथापन यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या उल्लंघनावर निवडणूक आयोगाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही, आयोगाचे ‘मौन’ म्हणजे घटनात्मक जबाबदारीपासून पळ काढणे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पंतप्रधानांनी केलेले हे भाषण राजकीय स्वरुपाचे होते. यात त्यांनी थेट विरोधी पक्षांची (काँग्रेस, तृणमूल काँग्रेस इ.) नावे घेऊन त्यांच्यावर टीका केली होती. निवडणूक काळात अशा प्रकारे सरकारी तिजोरीतून चालणाऱ्या माध्यमांचा वापर सत्ताधारी पक्षाच्या प्रचारासाठी करणे हे लोकशाहीतील ‘लेव्हल प्लेइंग फील्ड’च्या (समान संधी) तत्त्वाच्या विरोधात आहे, असा आरोप प्रथापन यांनी केला आहे.याप्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी आणि लोकप्रतिनिधी कायद्यांतर्गत त्यांच्यावर कारवाई का होऊ नये, याबाबत विचारणा करावी, अशी मागणी काँग्रेस नेते प्रथापन यांनी या याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे.

----------------------------------------

राहिलो आता पवार गट आणि उद्धवसेना यांनी आम्हाला पाठिंबा द्यावा, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आणि दुसरीकडे ही जागा उद्धव ठाकरेंसाठीच सोडावी अशी भूमिका घेतली गेली तर मविआत पेच निर्माण होईल, असे म्हटले जात आहे. यातच खासदार सुप्रिया सुळे यांनी एक्सवर पोस्ट करत उद्धव ठाकरे यांना समर्थन असल्याचे म्हटले आहे.महाराष्ट्रात विधानपरिषदेची निवडणूक होऊ घातलेली आहे. ही निवडणूक राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच लढावी अशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची आग्रहाची विनंती आहे. उद्धव ठाकरे हे राज्यातील ज्येष्ठ व अनुभवी नेते आहेत. त्यांच्या अनुभवाचा राज्याला तसेच सभागृहाला सदैव फायदाच होत राहील, असा आम्हा सर्वांना विश्वास आहे. उद्धव ठाकरे यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा ही नम्र विनंती, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात विधानपरिषदेची निवडणूक होणार आहे. या जागेवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे लढणार असतील तर त्याचे स्वागत असेल. पण ते जर निवडणूक लढणार नसतील तर मग महाविकास आघाडीचा उमेदवार कोण असेल याबाबत चर्चा करावी लागेल. कारण त्यानंतर येणाऱ्या राज्यसभेच्या जागी कोणत्या पक्षाचा उमेदवार असेल याबाबत ही आताच स्पष्टता करावी लागेल! महाविकास आघाडी एकसंध राहण्यासाठी तिन्ही पक्षाच्या समन्वयाने निर्णय घ्यावे लागतील. मीडियाच्या माध्यमातून याबाबत चर्चा घडवून आणणे उचित नाही, असे काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार यांनी स्पष्टपणे सांगितले.दरम्यान, मला जे समजते, त्यानुसार माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे जर पुन्हा उमेदवार असतील तर ही निवडणूक बिनविरोध होऊ शकेल. आता महाविकास आघाडीकडून खासकरून शिवसेनेकडून काय भूमिका घ्यायची या संदर्भात आम्ही महाराष्ट्रात बसून निर्णय घेऊ, असे संजय राऊतांनी म्हटले होते.

----------------------------------------

यांनी दिली.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 18 विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू तसेच विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह उपस्थित होते.उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, मॉडयुल, इग्नॉट, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बैटरी, इलेक्ट्रीक वाहन निर्मिती/ साहित्य, स्टील व गॅस टू केमिकल निर्मितीचे विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यासाठीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली.नाशिकमधील ‘व्हर्च्युओसो कॉम्प्रेसर्स’ कंपनी 800 कोटींची गुंतवणूक करून 500 जणांना रोजगार देणार आहे. अमरावती येथे ‘टेंबो डिफेन्स प्रोडक्ट’ कंपनी एक हजार कोटींची गुंतवणूक करत आहे.छत्रपती संभाजीनगरमधील ‘नायडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया कंपनी’ एक हजार कोटींची गुंतवणूक करून एक हजार नवीन रोजगार निर्माण करणार आहे. पुण्याच्या शिरूर भागात ‘जबिल सर्किट इंडिया प्रा. लि’. 1500 कोटींच्या गुंतवणुकीतून 3 हजार लोकांना संधी देणार आहे. गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागात ‘हरिओम पाईप इंडस्ट्रीज’ कंपनी 3 हजार 135 कोटींची गुंतवणूक करून 8 हजार जणांना रोजगार देणार आहे.

अहिल्यानगरमध्ये ‘निबे स्पेस’ कंपनी 4 हजार कोटींच्या गुंतवणुकीसह एक हजार रोजगार निर्माण करेल. पुण्याच्या तळेगाव भागात ‘युरोबस इंडिया’ कंपनी 4 हजार 200 कोटींची गुंतवणूक करणार असून तेथे 12 हजार रोजगार निर्मिती होईल. चंद्रपूरमध्ये ‘मिलीयन स्टील’ कंपनी 256 कोटींच्या गुंतवणुकीतून 360 जणांना रोजगार देणार आहे. भंडारा जिल्ह्यात ‘अशोक लेलँड लि’. 10 हजार कोटींची मोठी गुंतवणूक करणार आहे. नागपूरच्या बुटीबोरी येथे ‘ॲकमे क्लीनटेक सोल्युशन’ लि. 11 हजार 400 कोटींची गुंतवणूक करणार असून 7 हजार रोजगार निर्माण होतील.तर याच कंपनीचा रायगड/पालघरमधील ग्रीन स्टील प्रकल्पात 11 हजार कोटींची गुंतवणूक आणि 2 हजार 500 रोजगार निर्मिती होईल. नागपूरमधील सोलार डिफेन्स अँड एरोस्पेस लि. 12 हजार 780 कोटींच्या गुंतवणुकीतून 6 हजार 825 जणांना रोजगार उपलब्ध होईल. ‘ग्लोब फोर्ज लिमिटेड’, अहिल्यानगर आणि धाराशिवमध्ये 15 हजार 430 कोटींची गुंतवणूक करून 3 हजार 600 लोकांना रोजगार देणार. रायगड येथे ‘बालासोर अलॉयज’ 17 हजार 479 कोटींची गुंतवणूक आणि 3 हजार 200 रोजगार देणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये ‘गोदावरी न्यु एनर्जी प्रा’. लि. 27 हजार,515 कोटींची गुंतवणूक करून 4 हजार रोजगार निर्माण करणार आहे. रायगड/पालघरमध्ये ‘ॲकमे क्लीनटेक प्रा.लि’.चा ग्रीन अमोनिया प्रकल्पात 37 हजार 800 कोटींची गुंतवणूक आणि 4 हजार 500 रोजगार निर्मिती होणार आहे. गडचिरोलीत ‘रश्मी मेटलर्जिकल इंडस्ट्री’ 40 हजार कोटींची गुंतवणूक आणि 20 हजार रोजगार निर्माण करणार आहे. .या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. तसेच तांत्रिक नवकल्पना, संशोधन-विकास आणि मजबूत पुरवठा साखळी निर्माण होण्यास मदत होईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही याचा लाभ होणार आहे. याशिवाय, स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण व कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होऊन त्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होणार आहे.

----------------------------------------

व्यासपीठ मिळवून दिले आहे. आता व्हॉलीबॉलच्या निमित्ताने त्यांनी ग्रामीण भागातील या लोकाश्रय लाभलेल्या खेळाला पुन्हा उभारी देण्याचा प्रयत्न केला आहे. या उपक्रमामुळे केजमधील तरुण पिढीमध्ये व्हॉलीबॉलची आवड निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

दात्यांच्या पाठबळाने स्पर्धेची रंगत वाढली

या भव्य क्रीडा महोत्सवाला अधिक बळ देण्यासाठी अक्षय भैय्या मित्र मंडळ (केज), पशुपतिनाथ दांगट आणि कबीर इनामदार यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी खेळाडूंना आकर्षक बक्षिसे जाहीर करून आयोजकांचा उत्साह द्विगुणित केला आहे. त्यांच्या या सहकार्यामुळे स्पर्धेला राज्यस्तरीय स्वरुप प्राप्त झाले असून सर्वत्र कौतुक होत आहे.

दिग्गजांचा सन्मान आणि नव्या पिढीला प्रेरणा

केज शहराला व्हॉलीबॉलचा मोठा वारसा लाभलेला आहे. येथील अनेक ज्येष्ठ खेळाडूंनी या खेळाच्या जोरावर पोलीस दल, रेल्वे पोलीस, शिक्षण क्षेत्र (प्राचार्य) आणि विविध शासकीय सेवांमध्ये उच्च पदांपर्यंत मजल मारली आहे.

विशेष गौरव सोहळा: स्पर्धेदरम्यान या यशस्वी ज्येष्ठ आणि वरिष्ठ खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

उद्देश: आपल्या भागातील तरुणांनी या दिग्गजांचा आदर्श घेऊन क्रीडा क्षेत्रात करिअर करावे आणि केजचे नाव उज्ज्वल करावे, हा यामागील मुख्य हेतू आहे.

नियोजनाची धुरा खंबीर हातांत

या स्पर्धेच्या यशस्वी नियोजनासाठी मुख्य आयोजक म्हणून अकबर इनामदार, एत्तेशाम कादरी, प्रकाश मुंडे, सुनील घोळवे, खद्दिर कुरेशी आणि जिशान कादरी हे अहोरात्र परिश्रम घेत आहेत. त्यांच्या चोख नियोजनामुळे खेळाडू आणि प्रेक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

आयोजकांचे आवाहन:

“केजच्या क्रीडा परंपरेला उजाळा देणारा हा सोहळा असून, शहरातील सर्व नागरिकांनी आणि क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा,” असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

----------------------------------------

(दिशा) बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर समितीचे सचिव तथा जल्हिाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील, निवासी उपजल्हिाधिकारी शिवकुमार स्वामी, मोहन जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. दिशा समितीच्या बैठकीत रस्ते व पाणीपुरवठा कामांवर सर्वाधिक चर्चा करण्यात आली.

यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले, जलजीवन मिशन आणि पेयजल व स्वच्छता विभागाच्या कामांमध्ये भ्रष्टाचाराच्या तक्रारी येत असून, अनेक ठिकाणी नळ योजना केवळ कागदावरच आहेत. रस्ते खोदून ठेवले आहेत पण पाणी मिळत नाही, यावर त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाच्या कामांच्या दर्जाबाबत त्यांनी अभियंत्यांना कारणे विचारली.

----------------------------------------

विद्यार्थ्यांसाठी शालेय सर्व विषयांचा समावेश करण्यात आला आहे. वाचन-लेखनाचे सराव, गणिताची सोपी उकल, पर्यावरण व सामान्यज्ञानाचे घटक, तसेच सर्जनशीलतेला वाव देणारे विविध उपक्रम यामुळे हा अभ्यासक्रम ‘शिकत-खेळत पुढे जाण्याचा’ आनंद देणारा ठरत आहे. प्रत्येक इयत्तेनुसार नियोजनबद्ध पद्धतीने तयार केलेल्या या उन्हाळी अभ्यासक्रमामध्ये उपयुक्त सराव दिला असून विद्यार्थ्यांच्या हाती जणू ज्ञानाची शिदोरीच देण्यात आली आहे.या प्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. “दररोज थोडासा अभ्यास म्हणजे उद्याच्या यशाचा पाया,” असा प्रेरणादायी संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना नियमिततेची सवय जोपासण्याचे आवाहन केले. वेळेचे योग्य नियोजन कसे करावे, सुट्टीचा आनंद घेतानाही अभ्यास कसा टिकवावा, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाचे उत्साहाने स्वागत केले. “सुट्टीतही काहीतरी नवीन शिकायला मिळणार,” या आनंदाने त्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता झळकत होती. पालकवर्गातूनही या उपक्रमाचे मनापासून स्वागत होत असून, मुलांचा अभ्यासाशी संपर्क कायम ठेवणारे हे पाऊल अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

संस्कार प्राथमिक शाळा ही केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेली शाळा म्हणून ओळखली जाते. ज्ञानासोबत संस्कारांची जोड देत प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यात उजेड पेरण्याचे कार्य शाळा सातत्याने करत आहे.या उपक्रमामुळे सुट्ट्यांचा प्रत्येक दिवस आता ‘शिकण्याचा उत्सव’ ठरणार असून, विद्यार्थ्यांचा अभ्यासाशी असलेला दुवा अधिक दृढ होणार आहे. परिणामी, नव्या शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी विद्यार्थी अधिक आत्मविश्वासाने आणि तयारीने सज्ज होणार आहेत.

----------------------------------------

सरासरी 40 रुपये प्रति किलो दर मिळाला.

लिंबू लागवडीतूनआतापर्यंत त्यांनी सुमारे 3.25 लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. विशेष म्हणजे, या शेतीसाठी त्यांचा एकूण खर्च केवळ 10 हजार रुपयांच्या आसपास राहिला आहे. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून त्यांना लिंबूची रोपे आणि तांत्रिक मार्गदर्शन मिळाले. याबाबत बोलताना गडदे म्हणाले, “मयंक गांधी सरांच्या प्रेरणेतून आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या मदतीमुळे मला हे यश मिळाले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.” सध्या उर्वरित जमिनीतही लिंबू लागवड वाढवण्याचा त्यांचा मानस असून, कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारी ही शेती पद्धत इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

----------------------------------------

वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक मुद्द्यांवर त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला असून, गरजूंना मदत करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि समाजात जागरूकता निर्माण करणे यामध्ये त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे.

त्यांच्या या सातत्यपूर्ण कामाची तसेच सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेसोबत सुरुवातीपासून असलेल्या सहभागाची दखल घेत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. अझरुद्दीन भाई सय्यद यांनी त्यांची प्रदेश संघटक म्हणून निवड केली आहे. या पदाच्या माध्यमातून राज्यभरातील युवकांना संघटित करून सामाजिक आणि संवैधानिक न्याय हक्कांसाठी लढा अधिक बळकट करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.निवडीबद्दल बोलताना शेख मुदस्सीर यांनी सांगितले की, ‘ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची असून, सामाजिक अस्तित्व आणि संवैधानिक अधिकारांसाठी मी अधिक जोमाने काम करणार आहे. संघटनेच्या माध्यमातून राज्यातील युवकांना एकत्र आणून सकारात्मक बदल घडवण्याचा माझा प्रयत्न राहील.’दरम्यान, त्यांच्या या निवडीबद्दल विविध सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

----------------------------------------

अंबाजोगाई येथून नवीन ट्रान्सफार्मर मागवून घेतला. सायंकाळपर्यंत नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आणि रात्री सुमारे 8 वाजता वीजपुरवठा पुन्हा सुरळीत करण्यात आला.

कडक उन्हात दिवसभर मेहनत घेऊन वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत असून, त्यांच्या या तत्पर सेवेसाठी आभारही व्यक्त करण्यात येत आहेत.

----------------------------------------

सांगितले की, पारदर्शक प्रशासन, भ्रष्टाचारमुक्त व्यवस्था आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय हे पक्षाचे मुख्य उद्दिष्ट असेल. ॲड. चव्हाण यांनी विशेषतः युवकांवर लक्ष केंद्रित करत सांगितले की, “आजचा युवक हा बदल घडवण्यास सक्षम आहे. त्याला योग्य दिशा आणि संधी दिल्यास महाराष्ट्राचा चेहरा बदलू शकतो.” त्यांनी युवकांना जनहित लोकशाही पार्टीशी जोडण्याचे आवाहन करत, नव्या नेतृत्वाला संधी देण्याची गरज अधोरेखित केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना त्यांनी सांगितले की, “राज्यातील शेतकरी आजही कर्जबाजारीपणामुळे त्रस्त आहे. कर्जमाफीच्या घोषणा केल्या जातात, पण त्या पूर्णपणे अंमलात आणल्या जात नाहीत. आम्ही सत्तेत आलो तर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस आणि कायमस्वरुपी उपाययोजना करू. ”महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरही त्यांनी सरकारवर टीका करत म्हटले की, “राज्यात महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढत आहेत. कायदा सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. जनहित लोकशाही पार्टी महिलांच्या सुरक्षेसाठी प्राधान्याने काम करेल. ”ॲड. शंकर चव्हाण यांनी पुढे सांगितले की, “आज महाराष्ट्राला नव्या विचारांची आणि ठोस नेतृत्वाची गरज आहे. केवळ सत्तेसाठी राजकारण न करता, जनतेच्या हितासाठी काम करणारे सरकार आवश्यक आहे. 2029 मध्ये जनतेच्या पाठिंब्याने जनहित लोकशाही पार्टी सक्षम सरकार स्थापन करेल, याबाबत आम्ही आशावादी आहोत.”त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरणात चर्चा सुरु झाली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवीन समीकरणे तयार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जनतेमध्येही नव्या पर्यायाच्या शोधाला वेग मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. एकंदरीत, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव अल्हाट यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. शंकर चव्हाण यांनी मांडलेली भूमिका ही केवळ राजकीय घोषणा नसून, जनतेच्या अपेक्षा आणि असंतोषाचे प्रतिबिंब असल्याचे मानले जात आहे. आता आगामी काळात जनहित लोकशाही पार्टी कितपत प्रभावीपणे आपली भूमिका मांडते आणि जनतेचा विश्वास मिळवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पान 4 वरुन

विस्तार अधिकारीचा तब्बल पंधरा वर्षाच्या कार्यकाळातून विविध परीक्षा देऊन एमपीएससी मार्फत 2017 पासून या पदासाठी प्रयत्नशील होते. लातूर येथे त्यांची नियुक्ती पदोन्नतीतून झालेली आहे. सत्काराला उत्तर देताना त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा पाढाच वाचला आणि त्यांना करावे लागलेल्या प्रयत्नांची पराकाष्ठा ऐकून सर्व स्तब्ध झाले. प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अरविंद फुलारी यांनी मार्गदर्शन करून कर्म आणि फळ या विषयीचे त्यांच्या जीवनातील अनुभवावरुन मनोगत कथन केले यथायोग्य वेळी जे प्राप्त होते त्यासाठी प्रयत्न करत राहिले पाहिजे असे मनोगत मांडले. या वेळी संजय फुलारी, अजित फुलारी,पत्रकार अनिल फुलारी, हरिष फुलारी,सचिन फुलारी, शिवकुमार फुलारी, अमित फुलारी, सुमित फुलारी, हर्षवर्धन फुलारी मनोज आलदे यांचीही कार्यक्रमात उपस्थिती होती.या वेळी स्नेही मित्र मंडळाच्या वतिने विशेष सत्कार, अभिनंदन शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन बालाजी कांबळे सर यांनी करून प्रेक्षकांची मने जिंकली. तर आभार प्रदर्शन छायाचित्रकार सुनील फुलारी यांनी खुमासदार शैलीमध्ये केले.

----------------------------------------

होत आहे. त्यांच्या या संशोधनामुळे ग्रामीण भागातील तरुणांसमोर संशोधनाचे एक नवीन आदर्श निर्माण झाले आहेत.

----------------------------------------

मिळाल्यामुळे भविष्यात देखिल विकास कामाकरिता रुई पिंपळा गावाला चालणा मिळणार आहे हा सन्मान मिळाल्यामुळे मा श्री मयुर ( शेठ ) आंधळे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

----------------------------------------

श्रीनिवास घोळवे, इम्रान कादरी, चंदर गीते, आनंद लोंढे, सराफा असोसिएशन अध्यक्ष रामचंद्र भाऊ निर्मळ, संदीप चिद्रवार, मदन धोत्रे, धीरज भावटणकर, अनिल शेळके, सुरेश शिंपले, संदीप खिलोजी, पत्रकार अनिल महाजन, नागनाथ सोनटक्के, दिनेश कापसे, अतुल भैया शिनगारे, नगरसेवक बालाजी चव्हाण, प्रदीप नेहरकर, बाळासाहेब खामकर, बाळासाहेब गायकवाड, अशोक गोत्रे, डॉ. लक्ष्मण निर्मळ, बालाजी निर्मळ, संतोष गायके, तुकाराम शिनगारे, विजय निर्मळ, गजानन शेळके, अमोल शेळके, वामन गुन्नाल, भारस्कळ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, उन्हाळ्यात प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे.

----------------------------------------

मुंडे, राहूल ताटे, नारायणराव वानखेडे, वर्षा हाके, अमोल कांबळे, संजय वानखेडे, संजय सुरवसे, भीमसेन गडदे, भागवत मुंडे, विनोद देशमुख, वाघेश रेवडकर, अमर देशमुख, शिवशंकर शिंगणे, विश्वनाथ कांबळे, नागेंद्र जाधव, श्री घोलप, सौ.आर. आर.जाधव, सारीका मलशेटवार, प्राजक्ता खानापूरे, सारीका भोसले यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

परळीतून प्रकाशित होणाऱ्या ‘सा.परळी परिसर’ या साप्ताहिकातून संपादकीय सदरात लिहिलेल्या विविध विषयावरील हा लेख संग्रह असून यापूर्वी या संग्रहाचे तीन भाग प्रकाशित झाले आहेत. श्री वाकडे यांचे हे सताविसावे पुस्तक आहे. मुख्याध्यापक श्री मोरे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी पुस्तकावर आपले मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या. आभार प्रदर्शन राहुल ताटे यांनी केले.

----------------------------------------

सांस्कृतिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता आणि नेतृत्वगुणांना चालना देणारी ही शाळा पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. यामुळे शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांमध्ये सातत्याने उत्साह असतो.

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही शालेय प्रशासनाने प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण ठेवण्यासाठी प्रवेश पूर्व परीक्षा आयोजित केली. या परीक्षेत मराठी, इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान, इतिहास आणि भूगोल या विषयांचा समावेश होता. ही परीक्षा सकाळी 11:00 ते 12:00 या वेळेत शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने घेण्यात आली. मराठी आणि सेमी-इंग्रजी माध्यमांसाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार करण्यात आल्या होत्या, ज्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता आणि शैक्षणिक तयारीचे मूल्यमापन करण्यासाठी काळजीपूर्वक रचल्या गेल्या होत्या. या परीक्षेत 103 विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन आपला प्रवेश निश्चित करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. सूर्यकांत कातकडे यांनी परीक्षेच्या आयोजनाबाबत विद्यार्थ्यांना आणि पालकांना नियम आणि सूचनांची माहिती दिली. ते म्हणाले, “आम्ही विद्यार्थ्यांना शैक्षणिक यशासह त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरित करतो. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह आणि तयारी पाहून आम्हाला आनंद होत आहे. आम्ही प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार प्रोत्साहन देण्यासाठी कटिबद्ध आहोत.प्रवेश परीक्षा प्रक्रिया ही केवळ निवडीची पद्धत नसून ती विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये शैक्षणिक दर्जाचे महत्त्व निर्माण करण्याचे एक प्रभावी साधन आहे “ असे प्रतिपादन संस्थेचे कार्यवाहक तथा शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत कातकडे यांनी प्रतिपादन केले .त्यांनी पालकांना शिक्षणात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.परीक्षेचा निकाल पुढील दोन दिवसांत विद्यार्थ्यांना वैयक्तिकरित्या कळवला जाईल. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नवीन शैक्षणिक सत्र जून 2026 पासून सुरु होईल. शाळेच्या व्यवस्थापनाने आणि शिक्षकांनी केलेल्या कठोर परिश्रमामुळे ही परीक्षा यशस्वीरीत्या पार पडली. उपस्थित पालकांनी शाळेच्या शिस्तबद्ध आयोजनाचे आणि व्यवस्थापनाचे कौतुक केले.या प्रवेश परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच, विद्यार्थी आणि पालकांनी दाखवलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल शाळेने आभार व्यक्त केले.

----------------------------------------

जमा करावा, असे राहुल सोनवणे यांनी स्पष्ट केले आहे. अधिक माहितीसाठी 9423472109 किंवा 8805255055 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

----------------------------------------

संत सेवालाल महाराज चौकात ‘हॉटेल नेहा’चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये बंजारा ढवारा मटन थाळी फक्त तीनशे रुपयांमध्ये पोट भरुन जेवण, स्पेशल चिकन थाळी फक्त 250 रुपयात पोट भरुन जेवण, त्याचबरोबर स्पेशल अंडाकरी थाळी 180 रुपयांमध्ये पोटभरुन जेवण अशा प्रकारचे स्पेशल या हॉटेल ध्यावर मान्यवरांना व जेवायला येणाऱ्या ग्राहकाला जेवण मिळणार आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्य बी. एम.पवार हे राजकीय क्षेत्रात सक्रिय असून, त्यांचे बंधू अंकुशराव पवार यांनी आता व्यवसाय क्षेत्रातही पाऊल टाकले आहे.

जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर पवार कुटुंबाने या नव्या उपक्रमाची सुरुवात केली असून, त्यांच्या या व्यवसायाला निश्चितच उत्तम यश मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देऊन अंकुशराव पवार यांना शुभेच्छा दिल्या. ताडसोन्ना रोडवर असलेल्या आमच्या नेहा हॉटेलला एकदा अवश्य भेट द्या असे आवाहन पवार कुटुंबाच्या वतीने करण्यात आले आहे.

----------------------------------------

चर्चा रंगली असून काही विरोधकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहे. दरम्यान, सोशल मीडियावर आ.अमित गोरखे साहेब यांच्या विरोधात आक्षेपार्ह पोस्ट आणि धमक्या दिल्या जात असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. परळी येथील सामाजिक कार्यकर्ते सुनील मस्के यांनी याबाबत चिंता व्यक्त करत, सरकारने विधान परिषदेचे आमदार तथा भाजपाचे महाराष्ट्र प्रवक्ता आमदार गोरखे यांना तातडीने सुरक्षा पुरवावी अशी मागणी एका प्रसिद्ध दिलेल्या पत्रकाद्वारे केली आहे. सध्या अ-ब-क-ड आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यात सामाजिक आणि राजकीय पातळीवर मोठी हालचाल सुरु असून, येत्या काही दिवसांत या विषयाला आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तरी

आमदार ,अमित गोरखे यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे ही आमची सकल मातंग समाजाच्या वतीने आग्रहाची नम्र विनंती,अभिमान मस्के सुनील मस्के (बीड) गंगाधर करंदीकर (नांदेड) रमेशराव खिल्लारे( हिंगोली) मारुती शेळके रमेश शेळके (परभणी) वशिष्ठ कांबळे (लातूर) तुकाराम भालेराव (मुंबई )नामदेव साठे (गंगाखेड ) शिवाजी सावळे ( सोनपेठ)सुनील शिंदे (संभाजीनगर )आदिनाथ कांबळे (धाराशिव ) गजानन कसबे (जालना )अरविंद कांबळे( नागपूर )गंगाधर शिंदे (वाशिम ) संजय वैरागड ( नागपूर )नरेश इंगळे बुधाजी सुरकर (अमरावती) कैलास थोरात सोनाजी थोरात

----------------------------------------

केली जाते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि माजी कायदेमंत्री म्हणून त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळते.

त्यामुळे केवळ औपचारिक पद्धतीने फोटोला हार घालून जयंती साजरी करणे योग्य नसल्याचे विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले.

याऐवजी, जयंतीनिमित्त विद्यापीठात सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच 14 एप्रिल ते 30 एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून जयंती उत्सव साजरा करण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यासोबतच, विद्यापीठ परिसरात डॉ.आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांची आणि कार्याची सतत प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

या निवेदनावर सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान, सामाजिक कार्यकर्ते विकास रोडे, अमरदिप हिवराळे, राहुल वाहूळ, अमोल घुगे, अक्षदा शिर्के आदींच्या स्वाक्षऱ्या असून, याबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

----------------------------------------

व्या केंद्रात 2 ऱ्या फेरीतील 41 पुस्तकांचा संच वाचण्याकरिता ॲड राजेश शिंदे यांना कार्यक्रमाचे अध्यक्ष जी.एम. भोले सर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. संचातील पुस्तके वितरणाची जबाबदारी ॲड राजेश शिंदे यांनी तर प्रकाश आंबेडकर नगर बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप चालवीत असलेल्या मोफत शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांकरिता 88 पुस्तकांचा संच वर्गशिक्षिका विशाखा वाघमारे यांना सुपूर्द करण्यात आला. सदरील पुस्तकांचा पुरेपूर फायदा विद्यार्थ्यांनी व पालकांनी घ्यावा अशी विनंती वाचाल तर वाचाल वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी केली याप्रसंगी अध्यक्ष जी.एम भोले आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की माणसाच्या जीवनात एक चांगले पुस्तक काय बदल घडवून आणू शकते हे गुरुवर्य केळुसकर गुरुजींनी भीमरावांच्या सत्कार प्रसंगी गौतम बुद्धाचे जीवन चरित्र पुस्तक भेट दिलेला प्रसंग सांगून व त्या जीवन चरित्राचा सखोल वाचन, चिंतन,मनन भीमरावांनी केले व पुढील जीवनात केलेले महान कार्य व ज्ञानप्राप्ती व देशाकरिता केलेले अतुलनीय कार्य सर्वांना ज्ञात आहे म्हणून पुस्तक वाचन म्हणजे केवळ मनोरंजन नाही तर विचार प्रगल्भता वाढविणे व जीवनात प्रगती करण्यास उत्तेजन होय डॉ.बाबासाहेबांचा बहुमोल विचार प्रत्येकाने लक्षात ठेवला पाहिजेत की पुस्तकाने मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणापुढेही नतमस्तक होत नाही. वाचन संस्कृती वाढविण्याकरिता पालकांनी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून थोर शास्त्रज्ञ, समाजसेवक, साने गुरुजी, डॉ. एपीजे अब्दुल कलाम,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे, पर्यावरणावरील एक तरी पुस्तक आपल्या पाल्याच्या हातात दिले पाहिजे व त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे की शरीर स्वास्थ्य सांभाळून पुस्तकाचे वाचन करून “वाचाल तर वाचाल.”

कार्यक्रमास आयु. जी एम. भोले,प्रा.श्रीराम जाधव. ॲड राजेश शिंदे,ॲड मनोज वाघमारे, ॲड तेजस वडमारे,एस. एस सोनवणे, विशाल गायकवाड यांनी वाचाल तर वाचाल च्या मित्र नगर येथील मुख्य केंद्राला भेट दिली, त्या सर्वांचे वाचाल तर वाचाल तर्फे धम्मपद , (प्रा. डॉ मनोहर सिरसाट लिखित)महामानव व (कवयित्री माया दिवाण) यांचे नवी पहाट हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. ॲड तेजस वडमारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

----------------------------------------

पुढे होण्यासाठी त्यांचा सर्व स्थरावर्ती विकास होण्यासाठी आरक्षण नावाची संधी उपलब्ध करून दिली आहे देशातील 7 ते 8रा ज्याने अनुसूचितजाति उपवर्गीकरणलगु केले आहे त्याच प्रमाणेमहाराष्ट्र सरकारने तथामुख्यमंत्री महोदयांनी वउप मुख्यमंत्री महोद यांनी तत्काल अनुसूचित जाति उपवर्गीकरण लगु करावे

----------------------------------------

तत्त्वावर केली जाणार आहे.

इच्छुक शेतकरी ग्राहकाने संबंधित संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा. वैयक्तिक शेतकऱ्यांनी ॲग्री ट्रॅक

फॉर्मर आयडी द्वारे व शेतकरी गट व उत्पादक कंपनी यांनी अधिकृत सदस्याच्या अँग्री स्टिक फार्मर आयडी द्वारे महा डीबीटी प्रणाली द्वारे नोंदणी करावी. नोंदणी प्रक्रिया दिनांक 15 मे 2026 पर्यंत सुरु राहणार असल्याची माहिती सचिन गिरी तालुका कृषी अधिकारी गेवराई यांनी दिली आहे.

तरी शेतकरी ग्राहकांनी या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात घेण्यात यावा असे आवहान ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

----------------------------------------

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
शुक्रवार दि. 24 एप्रिल 2026


# मनातली इच्छा जिद्द आणि चिकाटीने मिळवता येते -उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी.



परली वैजनाथ - मनातली इच्छा जिद्द आणि चिकाटीने मिळवता येते असे प्रतिपादन नुकतेच लातुर येथे नवनियुक्त उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी यांनी परळी येथे आयोजित सत्कार सोहळ्यात केले.

सतत प्रयत्न जिद्द चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर हे यश साध्य केले आहे. या कार्यक्रमासाठी परळी फुलारी मित्र मंडळाच्या वतीने नियोजन माधवबाग येथे करण्यात आले होते कार्यक्रमासाठी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक माजी सैनिक अरविंद गणपतराव फुलारी, प्रमुख पाहुणे परळी तालुका ओबीसीचे अध्यक्ष विलासजी ताटे, मराठवाडा साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. यल्लावाड, अखिल भारतीय फुलारी समाजा चे अध्यक्ष सुधीर फुलारी व सत्कारमूर्ती उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी यांचे उपस्थिती होती. कार्यक्रमात परळीतील फुलारी परिवारातील सर्वांनी उपस्थिती लावली तसेच परिवाराचे स्नेही मित्र मंडळातील मराठवाडा साहित्य परिषदेच्या सभासदांची व इतर शिक्षक मित्रमंडळींनी या सत्कारासाठी आवर्जून उपस्थिती लावली होती. मनोगतामध्ये अनंत मुंडे सर प्राचार्य अरुण पवार सर यांनी फुलारी परिवारा प्रति असलेले कौटुंबिक संबंध विस वर्षाच्या आठवणी जाग्या केल्या. प्रसंगानुरुप कविता सादर केली शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागभूषण फुलारी यांनी केले. प्रस्ताविकातून त्यांनी चांगले विचार, फुलारी समाज, विद्यार्थी, शिक्षकांना असलेले मार्गदर्शन व सल्ला अत्यंत महत्त्वाचे आहे असे आवर्जून वर्णन केले. समाजाच्या वतीने शाल, श्रीफळ मानाचा फेटा व 50 किलो फुलांच्या हाराने उपशिक्षणाधिकारी सुशील फुलारी यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी नंदकुमार खानापूरे,लाहोटी सर, संभाजी फुलारी सर,म.सा.प.सदस्य प्रा. संजय आघाव, बंडू आघाव सर, इंगोले सर, यांनी फुलारी सर यांचा सत्कार केला. व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती ओबिसी नेते ताटेजी यांनी शिक्षण संचालक व्हावे अशा शुभेच्छा व्यक्त केल्या. उस्मानाबाद जिल्ह्यात पान 3 वर

# 'मृद विज्ञान' आणि 'मशिन लर्निंग'चा संगम; परळी तालुक्यातील मांडव्याच्या सुपुत्राला पीएचडी प्रदान



परळी वैजनाथ, प्रतिनिधी: आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधणे काळाची गरज बनली आहे. याच विचारातून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने गिरीश दशरथ चाटे यांना त्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रबंधाबद्दल 'डॉक्टरेट' (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे.

गिरीश चाटे यांनी "A Novel Framework for Soil image Classification Using Machine Learning" या विषयावर आपले संशोधन पूर्ण केले. त्यांनी त्यांच्या संशोधनात मृद विज्ञान (Soil Science) आणि मशिन लर्निंग (Machine Learning) या दोन भिन्न क्षेत्रांची सांगड घालत मातीच्या वर्गीकरणासाठी एक नवीन 'फ्रेमवर्क' विकसित केले आहे. या तंत्रज्ञानामुळे मातीचे अचूक आणि जलद वर्गीकरण करणे शक्य होणार असून, याचा मोठा फायदा कृषी क्षेत्राला होऊ शकतो. विद्यापीठातील कॉम्प्युटर सायन्स विभागाचे डॉ. संदीप एस. भामरे यांचे त्यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून मोलाचे मार्गदर्शन लाभले. मूळचे मांडवा ता. परळी वैजनाथ जि. बीड येथील भूमिपुत्र असलेल्या गिरीश यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक पान 3 वर

# ना श्री प्रतापराव जाधव साहेब ( केंद्रीय मंत्री ) यांच्या हस्ते आदर्श युवक सरपंच मा श्री मयुर ( शेठ ) आंधळे सन्मानित



रुई पिंपळा ( बाबुराव तिडके ) रुई - पिंपळा या गावचे विद्याविभूषित आदर्श सरपंच मा श्री मयुर आंधळे यांनी हे गाव एक विकासाचे मॉडेल बनवलेले आहे अनेक पुरस्कार या गावाने पटकवलेले आहेत गावामध्ये शासनाच्या विविध योजना राबविण्यात येऊन विकासाच्या बाबतीत रुई पिंपळा हे गाव ग्रामविकास तथा पंचायतराजच्या नकाशावर झळकलेले आहे याची दखल घेऊन शासनाने देखिल अनेक पुरस्कार या गावाला बहाल केलेले आहेत दि 23 एप्रिल वार गुरुवार रोजी छत्रपती संभाजीनगर येथे दिव्य मराठी प्रस्तुत चर्चेतील चेहरे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते राजकिय सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या व्याक्तींना चर्चेला बोलाऊन चर्चेतील चेहरा शोधला जातो त्याच धर्तिवर राजकिय क्षेत्रातून आदर्श युवक सरपंच म्हणुन मा श्री मयुर आंधळे यांचा मा ना श्री प्रतापराव जाधव साहेब ( केंद्रीय आयुष्य , मंत्री ) यांच्या हास्ते सन्मान करण्यात आला हा सन्मान राजकिय दृष्ट्या महत्वाचा व मानाचा समजला जातो हा सन्मान रुई पिंपळा गावचे सरपंच मा श्री मयुरजी आंधळे यांना पान 3 वर

# स्व.सोजरबाई अंबादासराव निर्मळ यांच्या स्मरणार्थ पानपोईचे उद्घाटन संपन्न



वडवणी (प्रतिनिधी)

स्वर्गीय सोजरबाई अंबादासराव निर्मळ यांच्या स्मरणार्थ किल्ले धारूर बसस्थानक येथे पानपोईचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रवासी व नागरिकांना शीतपेय पाण्याची सोय व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते माधव तात्या निर्मळ, आगार प्रमुख नवनाथ चौरे, वाहतूक निरीक्षक मोदी, वाहतूक नियंत्रक गोकुळ जगताप, नामदेव तिडके, वरिष्ठ लिपिक बालाजी बिक्कड, श्रीमती रत्नमाला जावळे, पान 3 वर

# लक्ष्मण वाकडे यांच्या 'वैजयंती क्षेत्र' या लेख संग्रहाचे मुख्याध्यापक के.व्ही.मोरे यांच्या हस्ते प्रकाशन




परळी वैजनाथ, दि.23 (बातमीदार):- दैनिक 'सकाळ'चे परळी तालुका बातमीदार, ज्येष्ठ पत्रकार व शिक्षक लक्ष्मण वाकडे यांच्या 'वैजयंती क्षेत्र' भाग-4 या लेख संग्रहाचे प्रकाशन येथील उर्जानगर वसाहतीतील न्यू हायस्कूल शाळेत मुख्याध्यापक के.व्ही.मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

गुरूवारी (ता.23) शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक अमोल कांबळे यांनी केले. लेख संग्रहाबाबत लेखक लक्ष्मण वाकडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. वैजयंती क्षेत्र भाग क्र.4 मध्ये विविध विषयावरील सुमारे शंभर लेख आहेत. यापूर्वी प्रकाशित झालेल्या तीन भागात साडेतीनशेवर लेख समाविष्ट होते अशी माहिती यावेळी श्री वाकडे यांनी दिली.

कार्यक्रमास शाळेचे पर्यवेक्षक सतीश शहापूरे, उमेश देशमुख, ज्येष्ठ शिक्षक दाजीबा नखाते, बाबासाहेब पान 3 वर

# अभिनव प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, नेहरू चौक परळी वै . येथे शैक्षणिक वर्ष 2026-2027 साठी प्रवेश पूर्व परीक्षेची पहिली फेरी संपन्न

• प्रवेश परीक्षा प्रक्रिया ही केवळ निवडीची पद्धत नसून, ती विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये शैक्षणिक दर्ज्याचे महत्त्व निर्माण करण्याचे एक प्रभावी साधन आहे. - श्री.सूर्यकांत कातकडे (संस्था कार्यवाहक अभिनव स्कूल)




परळी (प्रतिनिधी): ज्ञान प्रबोधिनी विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अभिनव प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, परळी वैजनाथ येथे संस्थेचे संस्थापक सचिव परळी भूषण श्री. साहेबरावजी फड, अध्यक्ष श्री. राजेभाऊ जब्दे आणि संस्थेचे कार्यवाहक तथा शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष 2026-202 7 साठी इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश पूर्व परीक्षेची पहिली फेरी गुरवार दि . 23 एप्रिल 2026रोजी यशस्वीरीत्या पार पडली.

परळी वैजनाथ परिसरात आपल्या उच्च दर्जाच्या शिक्षण, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रसिद्ध असलेली ही शाळा विद्यार्थ्यांना वैयक्तिक लक्ष देण्यासाठी ओळखली जाते. क्रीडा, कला, संगीत तसेच पान 3 वर

# काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी मोठी संधी! बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या निवडींना वेग

» जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांचे इच्छुकांना अर्ज करण्याचे आवाहन



प्रकाश मुंडे | केज तालुका प्रतिनिधी : बीड जिल्ह्यातील काँग्रेसच्या संघटन मजबुतीसाठी आता हालचाली वेगवान झाल्या आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सूचनेनुसार, जिल्हयातील विविध सेल आणि विभागांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या निवडीसाठी इच्छुक कार्यकर्त्यांनी आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे.

प्रदेश काँग्रेस कमिटीचे समन्वयक व निरीक्षक माजी आमदार एम.एम. शेख, विद्याताई पाटील, सुरेंद्रजी घोडजकर आणि जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये मुख्य जिल्हा, तालुका व शहराध्यक्षांसह युवक काँग्रेस, NSUI, महिला काँग्रेस, सेवा दल, SC, ST, OBC, अल्पसंख्याक, VJNT आणि सोशल मीडिया अशा सर्व सेलच्या अध्यक्षांची निवड केली जाणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी आपला सविस्तर बायो-डेटा आणि विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण कुमार शेप यांच्याकडे प्रत्यक्ष किंवा PDF स्वरुपात पान 3 वर

# अंकुशराव पवार यांच्या 'हॉटेल नेहा'चे थाटात उद्घाटन संपन्न!



वडवणी प्रतिनिधी

वडवणी शहरातील ताडसोन्ना रोडवरील संत सेवालाल महाराज चौक येथे अंकुशराव पवार यांच्या 'हॉटेल नेहा' (व्हेज-नॉनव्हेज) चे उद्घाटन मोठ्या उत्साहात व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

या उद्घाटन प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, बाबूशेठ नहार, उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे, माजी सभापती बाबासाहेब वाघमारे, संपादक सतीश वाघमारे, माजी उपनगराध्यक्ष राजाभाऊ पवार, आप्पासाहेब पवार, मुन्ना शेठ पवार,नगरसेवक राहुल घाडगे, संतोष पवार,महारुद्र मुंडे, बाळराजे चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सविस्तर वृत्त असे की, वडवणी शहराजवळील ताडसोन्ना रोडवरील पान 3 वर




• राज्याचे मृद व जलसंधारणमंत्री ना. संजय राठोड यांची अ.भा. बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष शरदभाऊ राठोड यांनी मुंबई येथे जाऊन भेट घेऊन बंजारा समाजाच्या विकासासंदर्भात चर्चा केली. यावेळी मंत्री महोदयांनी शरदभाऊ राठोड यांचे चिरंजीव संराज याच्याशी गप्पा मारल्या.

# अनुसूचित जातीमध्ये अ-ब-क-ड उपवर्गीकरण मागणी प्रक्रियेवरून वातावरण तापले; आ.अमित गोरखे यांना झेड दर्जाची पोलिस सुरक्षा द्यावी- सुनील मस्के





परळी (प्रतिनिधी):- अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण (अ-ब-क-ड) करण्याच्या प्रक्रियेला राज्यात वेग आला असून, या महत्त्वाच्या विषयावर राज्य सरकारने 30 एप्रिल 2026 पर्यंत नागरिकांकडून निवेदने मागवली आहेत. समाजातील सर्व स्तरांपर्यंत न्याय पोहोचावा आणि वंचित घटकांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करत असलेले विधान परिषदेचे आमदार आणि भाजपाचे प्रवक्ते अमित गोरखे साहेब यांनी या प्रक्रियेला गती देण्यात पुढाकार घेतला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात मोठी पान 3 वर

# नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीत डॉ.आंबेडकर जयंतीला भव्यतेची मागणी; पुतळा उभारणीचा प्रस्ताव

– सम्यक विद्यार्थी आंदोलन



छत्रपती संभाजीनगर :- (औरंगाबाद) येथील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, कांचनवाडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्याची तसेच विद्यापीठ परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी कुलगुरूंना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, देश-विदेशात डॉ.आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी पान 3 वर

# वाचाल तर वाचाल" तर्फे जागतिक पुस्तक दिन उत्साहात संपन्न......

(129 पुस्तकाचे दोन संच वाचनाकरिता वितरित. )



बीड (प्रतिनिधी) सोशल मीडिया व इंटरनेटच्या मायावी जाळ्यात अडकून विद्यार्थी वाचनापासून; खेळाच्या मैदानापासून दूर राहत आहेत. लहानपणापासून वाचनाची गोडी लागावी म्हणून पालकांनी आपल्या पाल्यांना चांगली पुस्तके उपलब्ध करून दिली पाहिजेत. वाचन संस्कृती वाढावी म्हणून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने 2016 पासून बीड शहरात व परिसरात 44 मोफत वाचनालये सुरु करून 3200 पुस्तकांची उपलब्धता करून दिली आहे.आज दिनांक 23/ 4/ 2026 रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून मौजे वरवटी तालुका जिल्हा बीड येथील 44 पान 3 वर

# आनुसीच जाती आरक्षण अ.ब.क.ड उप वर्गीकरण तात्काळ करा

• सामाजिक कार्येकर्ते सुरज (भाऊ )लोखंडे



किल्ले धारूर प्रतिनिधि : बाबूराव तिडकेअनुसूचित जातिमधील 59 जातिच्या उपवर्गीकरनाच्या आनुषंगाने राज्यसरकारने 1 ऑगष्ट 2024 रोजी निर्णय घेऊन एक सदस्ययी समिति स्थापनाकली होती. त्या बदर समितिने अपला अहवाल राज्य शासनकडे पाठवला आहे. त्या अनुषंगाने जाति निहाय जनगणने अनुसार उपवर्गीकरण होने गरजेचे आहे.अ.ब.क.ड. उपवर्गीकरनामुळे आनुसुचित जातीच्यासर्व समाज घटकांना समान हाक्क आणि आधिकार मिळतील.अनुसूचित जातितिल प्रत्येक घटकांचा स्थिरांक उंचावणार आहे डॉ.बाबासाहेब अंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत आरक्षनाची तरतुद करून वंचित आणि मागासलेल्या घटकांना पान 3 वर

# शेतकरी ग्राहकांनी खरीप हंगाम बियाणांसाठी तात्काळ अर्ज सादर करावेत :- अनिल बोर्डे

गेवराई ( प्रतिनिधी) शेतकरी ग्राहकांनी शासकीय योजनेअंतर्गत सवलतीच्या दराने मिळणाऱ्या खरीप हंगाम बियाणांसाठी 2026 "महा डीबीटी " अर्ज तात्काळ सादर करावेत असे आवहान सचिन गिरी तालुका कृषी अधिकारी व बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांच्या संयुक्त पत्रका द्वारे करण्यात येत आहे.

खरीप हंगाम 2026 साठी विविध शासकीय योजनेअंतर्गत सवलतीच्या दरात मिळणाऱ्या बियाणांसाठी शेतकरी ग्राहकाने " महाडीबीटी " पोर्टलवर तात्काळ अर्ज सादर करावेत.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत ज्वारी ,मका, सोयाबीन , तुर, मुग आणि उडीद या पिकाच्या प्रमाणित बियाणे वितरणासाठी ही प्रक्रिया राबविली जात आहे. यामध्ये 10 वर्षाच्या आतील व 10 वर्षावरील अधिसूचित वाण तसेच गळीत धान्य( तेलबिया) अभियानांतर्गत 5 वर्षाच्या आतील वाणाचा समावेश आहे. लाभार्थ्याची निवड "आधी अर्ज करणाऱ्या प्राधान्य "या पान 3 वर